# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of Marathi

## Assignment

## Session: 2017 – 2018

Page :
Date : / /

Name :- Shalini . N . Parate

Std :- B. A. I

Sub :- Marathi

College Name :- Yashoda Girls Arts & Commerce College, Nagpur.

B. A. Ist

IInd Sem

Dr. Govindrao Ravdekar Sir

SEAL

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

# गद्य विभाग

## १. इरावतीबाई :-

एक दीपमाळ

- पु.ल. देशपांडे

प्रश्न :- इरावतीबाई कर्व्यांचे व्यक्तीचित्रण तुमच्या शब्दात करा.

इरावतीबाईंना दीपमाळ असे का म्हटले आहे.

इरावतीबाईंचे ज्ञान, लेखन आणि संशोधन याबद्दल लेखकाने कोणते मत व्यक्त केले आहे ?

उत्तर :- सन १९४३ मध्ये पुल फर्ग्युसन कॉलेजचे विद्यार्थी होते त्यावेळी फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल डी.डी. कुर्वे होते. ते फारच कडक शिस्तीचे होते. इतके शिस्तप्रिय की, त्यांच्या कोशात 'शिस्त' हा एकच शब्द असावा असे पुलनां व इतर विद्यार्थ्यांनां वाटायचे. शिस्तीच्या बाबतीत डी.डी. कुर्वे फारच कडक होते. पुल गमतीने म्हणतात की, त्यांचे मूळ आडनाव कदाचित कडवेच असावे व तत्कालीन इंग्रजी साहेबानां 'ए' ऐवजी 'ड' म्हणायची सवय असल्यामुळे कडवेचे कुर्वे झाले असावे. इरावतीबाईंना पुलंनी प्रथम फर्ग्युसन कॉलेजच्या ॲम्फी-थिएटरात पाहिले. इरावतीबाईंचे व्यक्तीमत्व इतर मराठी बायकांपेक्षा फारच वेगळे होते. मराठी बायकांत सहसा न आढळणारी उंची आणि गौरवर्णामुळे तसेच त्यांचे डौलदार चालणे यामुळे त्या वेगळ्याच वाटायच्या. त्यांची उंची खरोखरच रसरशीत कांती, ठसठशीत कुंकू, घट्ट बुचडा, उठावदार रंगांचे लुगडे अश्या थाटात त्या डी.डी. कुर्व्यांसोबत

SEAL

आल्या होत्या. यावेळी कुणीतरी परदेशीबाई भारतीय वेशात आल्यासारखी पुलनां त्या वाटल्या उंची आणि गौरवर्णामुळे तसेच त्यांचे डौलदार चालणे यामुळे त्या वेगळ्याच वाटायच्या. त्यांची उंची खरोखरच असाधारण होती म्हणूनच 'काय दिपमाळ आहे!' असे सासूबाई त्यांची थट्टा करित असत. इरावतीबाईचे व्यक्तिमत्व आसमंत उजळणारे होतेच व कर्तृत्व डोळे दिपवणारे. त्यामुळे साहाजिकच 'दीपमाळ' ही थट्टेने उपमा दिली असली तरी पुलंनी त्या उपमेचे सोने केले आहे. उत्सवासाठी अनेक पणत्यांनी उजळलेली दिपमाळ चालत यावी तशाच त्या आल्या असे म्हणूनच त्यांनी म्हटले आहे. परंतु येथे दिपमाळेतील दीप दीपवण्यापेक्षा निववणारे असल्याचे पुल आवर्जून सागतात कारण 'इतराणा दिपवणे' हे इरावतीबाईना आवडत नव्हते. उलट शीतल तेजात न्हाऊन निघायला घटकाभर येऊन बसावे असा आपुलकीचा आसरा दिसणारा त्या चौथरा होत्या. इरावतीबाईच्या सासूने थट्टेने दिलेली उपमा अपौरुषेय उपमेसारखी चपखल मनात येवुन बसण्याचे कारण इरावतीबाईनां निरभिमानी प्रेमळ स्वभाव होता.

'आमिरची' तून 'मुकुंद टोपण' नावाने लिहिलेली 'परिपूर्ती' नावाची मराठी कथा छापून आली. केवळ दोनअडीच पानांची ती कथा होती. पुलंनी त्या कथेचे वर्णन 'सुंदर नर्मविनोद' आणि कमालीची हृदयगामी असलेली कथा असे केले आहे. त्या कथेतील 'मी'

म्हणजे एक स्त्री होती. कथेतील इतर तपशीलांवरून कर्वे-कुटुंब पुलंच्या डोळ्यांपुढे येत होते. कथेमध्ये एका सभेत त्या स्त्रीच्या विद्वत्तेच्या, पतीच्या मोठे-पणाच्या, सासऱ्यांच्या थोरवीचा परिचय करून देऊनही त्या स्त्रीला अपुरेपणा जाणवत राहातो. पण समारंभातून परतताना घराजवळच्या गल्ली-तल्या पोरांचे संभाषण त्या स्त्रीच्या कानी पडते. की 'ती बाई आहे ना? ती आपल्या वर्गातल्या कुल्याची आई आहे।" तेव्हा त्या स्त्रीला परिपूर्ती लाभल्याचे समाधान मिळते. पुलं म्हणतात की, त्यावेळी त्या देवीच्या मूर्तीला डोळे लागले व 'कुल्याची आई' या मंत्राने मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली. परिपूर्तीची निवेदनशैली अत्यंत मोहक घटनेसारखी असून ती गद्य पुलंना धुतल्या तांदळासारखे निर्मळ वाटले. साहजिकच 'कु' या टोपणनावाची ही लेखिका कोण? ही उत्सुकता शिगेला पोहचली. अभिरुचीतील एक लेखक असल्यामुळे पुलंना कथालेखिकेचे नाव कळले. इरावतीबाई कर्वे आणि त्यांच्या आश्चर्याला सीमा राहिली नाही. त्यांना वाटले नवऱ्याला सर्वदेखत 'दिनू' म्हणणारी बाई इतके सुबक मराठी लिहिते? प्राजक्ताच्या फुलासारखी इतकी नाजूक गोष्ट लिहिते. अमेरिकेत त्यांची इंग्रजी पुस्तके वाचली जातात. त्या इरावतीबाईंनी मराठीचे हे रूपडे इतके आत्मसात केले आहे? पुलंना या गोष्टीचे फारच अप्रूप वाटले. शिवाय अभिरुचीसारखे तत्कालीन वडील असलेले आनियतकालिक त्या विद्वान

SEAL

बाईची कथा छापते व ती सुद्धा मीतमीत आपले मूळ नाव राखून लिहीते लेखकाला हे सारे अजब वाटते.

त्या काळी मॉडर्न, पाश्चात्यविद्याविभूषित बाई बद्दलच्या कल्पना फारच टोकाच्या व चाकोरीबाहेरच्या होत्या. इरावतीबाई बाह्यतः तशा वाटत असल्या तरी त्यांचं पंढरीच्या वारीला जाणं आणि कुण्याची आई म्हटल्यामुळे आपल्यास परिपूर्तता मिळाल्याचे समाधान व्यक्त करणं हे सारेच स्तिमीत करणारे होते. पुलंप्रमाणे इतर अनेकांचे अंदाज साफ चुकले होते. शिवाय इरावतीबाई माणसांचे प्राचीन सांगाडे जमिनीतून उकरून काढून कवट्यांची मापे घेत 'मानववंशशास्त्राचे' महत्वपूर्ण संशोधन करण्याचं रूक्ष कार्य करित होत्या. त्यामुळे त्यांच्या संवेदना इतक्या तरल असतील अशी प्रशस्ती करणं व्यर्थ होतं. म्हणूनच यावेळी इरावतीबाईच्या संदर्भात त्या सीझरप्रमाणे 'आला, पाहीले, जिंकले' अशी प्रशस्ती करायला पुलं विसरलेले नाहीत. इरावतीबाईनी मराठी कथेचे क्षेत्र आल्याआल्याच जिंकले होते. त्यापूर्वी लावण्यक, अनेक अनावश्यक पुलंनी इरावतीबाईचा गौरव केला आहे. परिपूर्ती हे मराठी साहीत्यातले न कोमेजणारे फूल वाटले. परिपूर्तीमूळे इरावतीबाई सर्वसामान्यांच्या डोळ्यात भरल्या.

पुलंनी इरावतीबाईच्या व्यक्तिमत्वाचे कंगोरे उकलत असताना त्यांच्या पंढरीच्या विठूरायाबद्दल वाटणाऱ्या विलक्षण श्रद्धेची आवर्जून दखल

घेतली आहे. साधारणपणे डॉ. इरावतीबाई कर्वे सारख्या उच्चविद्याविभूषित, संशोधक, चिकित्सक वृत्तीच्या विदूषीने पंढरीच्या वारीत जाऊन, आपल्या ज्ञान, संपन्नतेचा ताठा बाजूला सारून जनाबाई, मुक्ताबाई होऊन वारी करावी याचे त्यांना अप्रूप वाटते. त्यांच्या पंढरीच्या वारीचे प्रेम पाहून म्हणूनच त्या निवर्तल्या तेव्हा रा.ज. देशमुखांनी त्या गेल्याचे सांगताच पुलंना त्या वारीला गेल्या असतील असे प्रथम वाटले कारण पंढरपूरला त्यांच्या जीवीचा जिव्हाळा होता. विठ्ठल हे त्यांचे व्यसन होते. म्हणून आषाढ-श्रावणाने त्या अस्वस्थ होत असत. जणू भरलेली चंद्रभागा त्यांना साद घालीत असे.

पंढरीच्या वारीला जाणारे लाखो भक्त महाराष्ट्रात आहेत पण इरावतीबाईंचे वारीला जाणे पुलंना नवल व्यक्त करण्यासारखे वाटते. कारण इरावतीबाई आपल्या ज्ञानाने, कर्तृत्वाने, संशोधनाने असामान्य झाल्या होत्या. मानववंशशास्त्रातल्या त्या महान विदूषी होत्या. त्यांची इंग्रजीतली पुस्तके अमेरिकेतही वाचली जात होती. ज्ञानाच्या क्षेत्रात खरोखरच त्यांनी भीम पराक्रम केला होता. इरावतीबाई निरीश्वरवादी बुद्धीप्रामाण्यवादी होत्या. एकाहून अधिक युरोपीय भाषांच्या जाणकार होत्या. लंडन-बर्लिन सारखी शहरे त्यांनी पायाखाली तुडवली होती. शिवाय

त्या संस्कृत भाषेतल्या पंडिता होत्या. डेक्कन कॉलेजला प्राध्यापिका होत्या. सामान्यांसाठी त्या 'चांगली शिकली सवरलेली ब्राम्हणाची बाई' होत्या. त्यामुळे चक्क पंढरीच्या वारीबरोबर त्या भाबड्या दीन, अशिक्षित, रांगड्या-गांजल्या मानवी प्रवाहात एक थेंब होऊन मिसळत होत्या. प्रत्येक अनुभव बुद्धीच्या निकषावर घासून पाहणाऱ्या त्यांच्यासारख्या बुद्धीमतीने त्या भाक्तिमंगेतून वाहतवाहत रखुमायाच्या महालापर्यंत जावे हे पाहून अनेकांनां आश्चर्याने धक्का बसला. आपले बुद्धिवैभव, पदव्या, लौकिक ज्ञानाची बिरुदं आपल्या अभ्यासाच्या खोलीत उतरून ठेवून त्या 'विठ्ठल विठ्ठल विठ्ठल' च्या तालात पावले टाकीत चालणाऱ्या सहस्त्रावधी विठ्ठल-रखुमायांच्या मेळ्यातील जनाबाई, मुक्ताबाई होऊन वारीस जात. वारीला चालायला मिळणे यात भाग्य मानून त्यांना कृतार्थ झाल्यासारखे वाटत होते आणि म्हणून त्यांनी पंढरीचा अबीरबुक्का वाटावा तसा 'वारी' या नावाचा लेख 'अभिरुची' तून लिहून पंढरीच्या वारीचा प्रसाद वाटला.

यावरून त्यांचे विठ्ठलाशी अजीब नाते होते असे म्हणायला वाव आहे. विठ्ठल हे त्यांचे व्यसन होते. असे म्हणणारे पुढे पुढे त्यांच्या तो बॉयफ्रेंड होता असेही म्हणतात ते यामुळेच की संसार, संशोधन, लेखन, अध्यापन ही दैनंदिन कामे पेलून ठिकठिकाणी प्रवास करुण पुढे वारीत सहभागी होण्याची ऊर्जा आणि आवड त्यांच्या ठायी होती. इरावतीबाई डेक्कन कॉलेजात संस्कृतीच्या महापंडित होत्या.

नंदु-गौरी-जाई या अपत्यांच्या आई होत्या, प्राचार्य दिनकर धोंडो कर्वेंच्या पत्नी होत्या, धोंडो केशव कर्वेंच्या नात-सून होत्या, मानववंशशास्त्रात त्यांचे संशोधन अविरत सुरू असायचे. रामायण, महाभारत इत्यादी महाकाव्यांचा त्यांचा सखोल अभ्यास होता. त्यांना युरोपीयन भाषा अवगत होत्या. देश विदेशात भरपूर फिरल्या होत्या. 'परिपूर्ती' सारखी कथा लिहिणाऱ्या यशस्वी मराठी लेखिका होत्या. संसाराची अपरिहार्य जबाबदारीही पेलत होत्या. डोंगर, दगड, वनस्पती-बद्दल त्यांना माहीती होती. निसर्गावर त्यांचे प्रेम होते. इतके असूनही सासुरवासिनीला परकरी पोर होऊन बागडावे असे वाटले की त्या पंढरीला जात. खूप वेळा पंढरपूरला जात. अगदी माहेरी निघालेल्या मुलीच्या उत्साहाने विठ्ठल-रखुमाईला रूचणारा साज लेऊन, कुंकू आधिक ठसठशीत करून, नवा चुडा भरून उत्साहाने जात असे.

पंढरीहून परतल्यानंतर माहेरच्या वैभवाच्या गोष्टी सांगाव्या तशा बालिश भावाने त्या पंढरीच्या कथा सांगत असत. त्यावेळी माहेरवाशिणीच्या चेहऱ्यावर जो आनंद दिसतो तसा शाळकरी पोरीचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. पंढरीची सय आली की इरावतीबाईंचे मनच मुळी-परकर पोलकं घालून नाचायला लागायचे. विठ्ठल त्यांच्या खेळगडी होता.

जणू त्या विठूशी मनातल्या मनात खूप बोलत असतील आणि सासरच्या वाटेतले मनाला होणारे चिरंतन काटे तो विठूराया हळूवारपणे काढीत असेल अशी साधार कल्पना पुलंनी केली आहे.

इरावतीबाईंनी मानववंशशास्त्रात मौलिक संशोधन केले आहे. आदिम समाजातील चालीरितींच्या अभ्यास, जमिनीत पुरलेले मानवी सांगाडे उकरून त्या कवटया व हाडांचा शास्त्रीय अभ्यास करून आपल्या संशोधनाला त्यांनी बळकटी आणली आहे. या कार्यासाठी त्यांना भारतात जागोजागी, रानावनात हिंडावे लागले असेल हे स्पष्ट आहे कारण मानववंशांचा शोध घ्यायला मानवाच्या प्राचीन अस्तित्वाच्या खाणाखुणा तपासत त्यांना जंगलात फिरावे लागले असणार. मानववंशांचा किंवा समाजशास्त्राचा अभ्यास करताना व्यक्त बहिष्कृत, विजनवासी अशा अनेक जातीजमातींतल्या माणसांशी त्यांचा स्नेह जुळला. त्या मानववंशांच्या प्राचीनतम खाणाखुणा शोधायला जंगलातून, डोंगरकपऱ्यातून आणि वाळूच्या समुद्रातून हिंडल्या. जिथपर्यंत महार पोहोचले तो. महाराष्ट्र हे स्थान त्यांना एका महार पट्टेकऱ्याने दिले होते. मुख्य म्हणजे या महापंडितेने ते आर्जित केले. रानावनात त्यांना अशाप्रकारे अनेक गुरू व आप्तसखे मिळत गेले, पण या कठोर परिश्रमाने त्यांनी त्रागा केला नाही उलट पहा

पधरा हजार वर्षापूर्वीची संस्कृती जतन करून
ठेवणाऱ्या पण चालताना पायाची सालडी
काढणाऱ्या वाळूबद्दलही त्यांच्या मनात कृतज्ञतेचा
भाव दिसून येतो म्हणून त्यांना वृक्षवल्ली
आम्हा सोयरी वनचरे या पंक्तीतल्या असल्याचे
पुले मानतात. त्यांच्या या संशोधनात त्यांनी
इतका जीव ओतला की जणू उत्खननातल्या
कवटीशी त्या बोलू शकत. उत्खननात सापडले-
ली कवटी तरुण मुलीची असल्यास ती ज्या
कोणा तरुणीची हजारो वर्षापूर्वी असेल ती
मुलगी ( आधीच्या जन्मातली ) मीच तर
नव्हे ? असे वाटतपर्यंत त्या कवटीशी त्या
एकरूप व्हायच्या. तात्पर्य, त्यांचे संशोधन
वरवरचे, दिखाऊ, लौकिकप्राप्तीचे किंवा पी.
एचडी मिळविण्यासाठीचे नसून अंतरीच्या
तळमळीतून होते असे हे पुलंना पटवून द्यायचे
आहे. अशा रितीने इरावतीबाई आपले अस्तित्व
स्थलकालातील करून अलौकिक बुद्धीची झेप
घ्यायच्या. त्या अशात तरुणीच्या हृदयाच्या
स्पंदनांशी इरावतीबाई आपल्या हृदयाची स्पंदने
जुळवून जात असत. त्यावेळी माणसामाणसातील
अमंगल भेदाभेद त्यांना भेडसावीत नव्हता. या
वेळी आपल्याला नको असताना चिकटणाऱ्या प्रति-
ष्ठाच्या अलंकारांचे जन्मजात श्रेष्ठत्वाच्या मूर्ख
संकेतांच्या सोवळ्याचे त्यांना ओझे होत
नव्हते.

इरावतीबाईंचे हे गुणवैशिष्ट्य सांगत असताना पुलंनी समाजातल्या पुसटलेल्या, पिडलेल्या मनातून उठणारे फूत्कार सहन करीत, त्या आदीवासी किंवा सामाजिक उपेक्षेच्या खातेऱ्यात पडलेल्या जमातील निस्संग होऊन हिंडणाऱ्या किंवा राहणाऱ्या मराठीजनांमध्ये अग्रपूजेचा मान मराठी पुरुषांनी नव्हे तर मराठी स्त्रियांनी मिळविला असल्याचे नमूद केले आहे. महाराष्ट्राच्या या पाच सुकन्यांमध्ये इरावतीबाई कर्वे, आदिवासी जीवनाचा शोध घेताना स्वतःचे जीवन संपुष्टात आणण्याचा धोका पत्करणाऱ्या दुर्गाबाई भागवत, डांगमधल्या वारल्यात आयुष्य ओतून दिलेल्या गोदावरी परुळेकर, चंबळच्या दस्युभूमीत दरोडेखोरांच्यातले माणुसकीचे झरे शोधीत हिंडलेल्या मीता सान आणि गुन्हेगार वस्त्यात प्रथम गेलेल्या मालतीबाई बेडेकरांचा पुलंनी आवर्जून गौरवाने उल्लेख केला आहे. वास्तविक ही सारी कामे पुरुषांना मानवणारी होती तरीही साहित्य संमेलने सत्कार समारंभ कशातही न मिरवता मराठी साहित्यात असामान्य अनुभवांची भर वरील पंचकन्यांनी घातली आहे. हे सत्य जाणून पुरुषांनी आपला अहंकार खरेतर गुंडाळून ठेवावा पण तरीही अहंकार उचल घेत असेल तर लक्ष्मीबाई टिळक आणि बहिणाबाई चौधरी ही दोन नावे घेतली की उरलासुरला पुरुषी अहंकार कापरासारखा जळून जाईल अशी

पुलंना खात्री वाटते.

पुलं म्हणतात की स इरावती बाईंना शास्त्रकाट्याची कसोटी होती म्हणूनच त्यांचे शब्द बनावट नसे. शब्दाची जात, गुणधर्म इतिहास नेमका होता. इरावतीबाई अनुभवाच्या आधारे बोलायच्या. त्यांची तळमळ, जिव्हाळा वरवरचा नव्हता तर हृदयाच्या गाभाऱ्यातून तो उमाळा येत असे म्हणूनच शास्त्र म्हणजे अभ्यास ज्ञान, व्यासंग आणि काटा म्हणजेच रानावनातून डोंगरकपाऱ्यातून हिंडून प्रसंगी पायांना काटा रुतून चालत घेतलेला अनुभव आणि पडताळा या आधारे त्यांच्या भावना व्यक्त होत. त्यांना बहुजनसमाजाविषयी जिव्हाळा होता पण तो त्यांची कीव येवून नव्हे तर त्यांच्याबद्दल वाटणाऱ्या आत्यंतिक आपुलकीने होता. त्यांचे लिहिणे नितळ असायचे. विचारचक्रं नेहमी तलपाणी देऊन निर्दोष ठेवलेले म्हणजेच विचारांची दिशा सुस्पष्ट आणि निर्मळ असे. त्या पूर्वग्रहदूषित नव्हत्या. त्यांच्या विचारांची वीण धागाधागा सुंदर विणून तयार केलेल्या वस्त्राप्रमाणे आखीव रेखीव असे. पाककृतीच्या बाबतीत त्या सुगरण होत्याच. त्यांचे महाभारत, रामायण इत्यादी महाकाव्यातील व्यक्तिचित्रणे वाचणे म्हणजे पुलंसारख्यांनाही पर्वणी वाटावी असा त्यांचा दर्जा असे. इरावती-बाईंनीच आमची बोटे धरून महाभारतातून आम्हाला हिंडवून आणले असल्याचे पुलं सांगतात

ते यामूळेच. इरावतीबाई बोलायला लागल्या की
प्रश्न पडे की आज त्या अत: सौंदर्याच्या विविध
रूपांनी नटलेल्या कुठल्या इरावतीबाई बोलायला
लागल्या आहेत, इतकी त्यांची सगळीच स्वरूपे
पुलंना आकर्षक वाटतात.

ज्ञानाच्या क्षेत्रातील अधमांनी मात्र त्या
वैतागलेल्या दिसायच्या. आपली चीड व्यक्त
करायच्या संताप व्यक्त करायच्या. याच भरात
त्यांनी म्हाताऱ्यांनी पन्नासावे वर्ष लागल्यावर मरून
जावे असे उद्गार वैतागून काढले होते. त्या
स्वातंत्र्याच्या भोक्त्या पण उच्छृंखलपणाच्या नव्हे.
त्या स्पष्ट होत्या पण अश्लील नव्हत्या.
त्यांचे लेख वाचण्यासाठी आपण जगले पाहीजे.
असे पुलंसारखे साहित्यीक म्हणतात. यावरून
इरावतीबाईची थोरवी कळून येते. पण केवळ विद्या,
ज्ञान, संशोधन याच क्षेत्रात त्या दैदिप्यमान
कामगीरी करित होत्या. असे मात्र नव्हे. त्यांचे
व्यक्तीमत्वच अष्टपैलू होते. त्यांची इटालीयन
स्कूटर त्या बोफाट वेगाने हाकायच्या. आपण
बाईमाणूस म्हणून त्यांना कधी त्याचा न्यूनगंड
वाटला नाही. पु. भागवतांना मागे बसवून त्या
अशाच सुसाट निघाल्या तेव्हा भागवतांना भीती
वाटली. तेव्हा त्यांनी त्यांचे खोटे खांदे धरून
बसायला सांगीतले. साहाजिकच पुरुषांनी बायकांना
लिफ्ट द्यायची हा साधारण आणी सार्वत्रिक
नियम भागवतांनी बोलून दाखवला. तेव्हा

स्त्री-पुरूष या भेदाचा आणि विशिष्ट कामे पुरूषांनीच करावी अशा समाजाच्या अपेक्षांचा आधीच वीट आलेल्या इरावतीबाईंनी भागवंताची 'हॅट्- शेवटी पुरूषच !' या शब्दांनी बोळवण केली.

पुलंना म्हणूनच वाटते की पुरूषांपैकी ज्याचे जीवन सर्वांगाने समृद्ध असते त्याला आपल्या संस्कृतीत पुरूषोत्तम असे म्हटले जाते. मग असे व्यक्तिमत्व असलेल्या स्त्रीला काय म्हणायचे? प्राचीन ऋषींनी याकरिता एखादा शब्दच योजिला नाही काय? इरावतीबाई जागतिक कीर्तीच्या विद्वत्ता आणि कुटुंबाची अशा आई दोन्ही भूमिकांमध्ये समर्थपणे वावरत होत्या. एकीकडे कवीमन असणे आणि दुसरीकडे हाडांचे सांगाडे तपासणे हे चित्र विसंवादी आहेच. ते सहसा दिसणार नाही पण इरावतीबाईंच्या संयमित ते वास्तव होते. मग अशी विसंवादी कृत्ये पार पाडणारी स्त्री असू शकते. अशी कल्पना बहुधा त्रिकालज्ञ म्हणवणाऱ्या ऋषींना नसावी अन्यथा त्यांनी स्त्रीयांचाही पूर्णवतार खरा मानून अशा स्त्रीसाठी एखादी 'पुरूषोत्तम' सारखी पदवी शोधून काढली असती !

# पद्य विभाग

## ३. या झोपडीत माझ्या

- राष्ट्रसंत तुकडोजी

SEAL

प्रश्न :- राष्ट्रसंत तुकडोजी यांनी 'या झोपडीत माझ्या' या कवितेत कोणती सुखं मिळाल्याचे सांगितले असून त्याद्वारे कोणता उपदेश करू पाहतात ? हे तुमच्या शब्दात लिहा. राष्ट्रसंतांच्या झोपडीचे वर्णन करून कवितेचा प्रतिपादय विषय समजावून सांगा.

उत्तर :- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे विदर्भाचे भूषण आहेत. त्यांचे उपदेश मानवी मनाला, जीवनाला आणि समाजराष्ट्राला नवसंजीवणी देणारे आहेत. 'ग्रामगीता' आणि कित्येक भजनातून त्यांनी मानवाच्या उद्धार करण्यासाठी केलेले कष्ट पाहून थक्क व्हायला होते.

सामान्य माणूस स्वार्थ आणि संकुचित-पणावर मात करू शकत नाही. कारण लोभ या मानवी वीकाराने तो ग्रासला असतो. मनुष्य नेहमी अधीकाधिक सूखांच्या मागे लागलेला असतो. सूखाची त्याची व्याख्या मात्र अत्यंत दिशाभूल करणारी आहे, याची त्याला जाणीव नसते. प्रत्येक मणुष्य राजेशाही सूख मागायला आतूर आहे हे पाहून तुकडोजी व्यथीत झाले असावे. वास्तविक आपण सूख कशाला मानतो हे तपासने आवश्यक असते. पण त्यासाठी मनाला जी वैचारिक उभारी मिळण्याची गरज असते, तिच संत देत असतात. मनाला जर समजावले की त्यात ते सूख आहे असे मानले त्यात खरे सूख नाही, तर मनूष्य जीवन खऱ्या सूखाकडे वाटचाल

करू लागले. जे सुख त्याग करण्यात आहे ते भोगात नाही. आपली भारतीय संस्कृती त्याग करायला सांगते, परोपकार करायला सांगते, त्याचे स्मरण या सुंदर कवितेतून तुकडोजी करून देत आहेत.

खरे संत तेच ते त्याग करतात, परोपकार करतात आणि इतरांचे हितच चिंतीतात. राष्ट्रसंत तुकडोजी तर राष्ट्रसंत होते त्यांचे या कवितेतून व्यक्त झालेले विचार आजच्या पाश्चिमात्य भोगवादी संस्कृतीकडे आकर्षित होऊ पाहणाऱ्या तरुण पिढीला मार्गदर्शक ठरणार आहेत. राष्ट्रसंत या कवितेतून त्यांच्या झोपडीत वास्तव्य करण्यातील सुख किती थोर आहे हे सांगत आहेत. या कवितेतून राष्ट्रसंत हे सांगत आहेत की, इतरांचे सुख पाहून दुखी - कष्टी होऊ नका. तुमच्याजवळ जी काही साधने असतील त्यात समाधान माना आणि भगवंताच्या नामस्मरणात गुंतून ते सुख प्राप्त करा, जे कधीही संपणारे नाही. हे तत्व इतके उच्च आणि श्रेष्ठ आहे की ते सांगूनच जनतेला कळणार नाही म्हणून स्वतःच्या झोपडीतील जीवनाची राजाच्या महालातील जीवनाशी तुलना करून तुकडोजी त्यातील सुखाचा भेद उकलून दाखवित आहेत.

राजा श्रीमंत आणि सत्ताधीश असतो, त्याला संपन्नतेने आणि सत्तेने जे सुख

सुख मिळत आहे असे वाटते की वास्तविक
सुख नसून केवळ सवलती आहेत. महालात
राहताना राजाना वाटते की, माझ्याइतका
सुखी कोणी नाही. पण तुकडोजीसारख्या विरक्त
संतांना ते सुख किंबहुना त्याहून श्रेष्ठ सुख
झोपडीतून मिळत असे. महालात मऊ बिछाने,
कुंदील - शामदाने असतील. पण उत्तम झोप
घेण्यासाठी ती आवश्यक आहेत असे कुठे आहे?
राष्ट्रसंतांना तर जमीनच मानवते असे ते
निःसंदिग्धपणे सांगतात. भूमीवर पडून काळ्या-
शार गगनातील लुकलुकणारे तारे पहावे आणि
प्रभूचे नाम नित्य गात रहावे यासारखे दुसरे
सुख नाही. महालात जशी राजाची सत्ता
चालते तशी सत्ता राष्ट्रसंतांची झोपडीत
चालते. हुकूम चालतो. म्हणजे राजाच्या
अधिकाराचे सुख येथेही मिळाले नाही का?
पण महाल म्हटला की पहारे, शस्त्रे असतात.
झोपडीत कशाला हवे शस्त्र आणि शिपाई?
त्यांची गरजच नाही. म्हणजेच भय नाही, शत्रू
नाही. महालात जाण्याचे मनात आले तर
जागोजागी चौकशी होईल. परवानगी नाकारण्यात
येईल. अपमान होईल. पण माझ्या झोपडीत
यायला परवानगी घ्यावी लागणार नाही. कोणतीच
भीती नाही, केव्हाही या, झोपडीत स्वागत
आहे. महालात चोरीची शक्यता असतेच
कारण तिथे संपत्ती असते. माझ्या झोपडीत

SEAL

ते द्रव्य नाही. त्यामुळे चोरांचे भय नाही.
माझ्याजवळ प्रभुनामस्मरणाचे ते धन
आहे जे कोणी चोरू शकणार नाही. म्हणून
'पैसे कधी न झाले.' असे तुकडोजी
म्हणतात. महालापुढे पहारे असूनही चोऱ्या
झाल्या आहे माझ्या दाराला तर दोऱ्याही
बांधल्या जात नसूनही इथे चोरीचे भय
नाही. असे सुख महालात मिळेल का? शक्यच
नाही. उलट सतत चिंतातूर राहून रात्री
झोप येणार नाही. माझ्या झोपडीत मात्र
सुखाची झोप मिळते. म्हणूनच या सुख
देणाऱ्या झोपडीत सुखाने या, सुखाने जा.
कोणावर कोणताही वचक नाही. अशाप्रकारे
महालातील सुख झोपडीतील सुखापुढे तू
तुच्छ ठरते.

PRINCIPAL
Yeshoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

SEAL